# ‘श्रीशिवछत्रपती’

## पूर्वार्ध

प्रा. श.श्री. पुराणिक

■ प्रकाशक : छाया प्रकाशन,
३६, न्यू आनंदनगर,
तळेगाव दाभाडे. ४१० ५०६

■ © प्रा. श. श्री. पुराणिक

■ अक्षरजुळणी : श्री. अनिल प्रधान

■ मुद्रक : रिच प्रिंटस, पुणे.

■ प्रकाशन दिनांक :जुलैए २०१६

■ किंमत रु. ४५०/-

**अर्पण पत्रिका**

चि.मृणाल,

चि.उमेश

व

चि. सुधीर

या शिवभक्त सुपुत्रांस......

# प्रस्तावना

छत्रपती शिवाजीमहाराजांची अनेक चरित्रे अनेक भाषांत प्रसिध्द झाली आहेत. केळुसकरांचे 'शिवचरित्र', ब.मो.पुरंदरे यांचे 'राजा शिवछत्रपती', वा.कृ. भावे यांचे 'युगप्रवर्तक छत्रपती शिवाजीमहाराज', ग.भा.मेहेंदळे यांचे 'राजा शिवछत्रपती',जदुनाथ सरकार यांचे 'शिवाजी' कविंद्र परमानंद यांचे संस्कृतातले 'शिवभारत' अशी अनेक चरित्रे असतांना या आणखी एका शिवचरित्राचे प्रयोजन काय ते प्रथम सांगितले पाहिजे.

वरील शिवचरित्रात निवेदनाला महत्व देऊन शिवाजी महाराजांची चरित्रकहाणी त्यांच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत सांगितली आहे. माझ्या या शिवचरित्रात शिवाजीमहाराजांच्या व्यक्तिदर्शनाला महत्व दिले आहे. शिवाजी महाराज हे चरित्राचे केंद्रबिंदू असून सर्व निवेदन त्या केंद्रबिंदूच्या अनुरोधाने केलेले आहे. शिवाजी महाराजांचे व्यक्तितत्व अतिशय गुंतागुंतीचे आहे. 'लोकोत्तरांची चित्ते कोण समजू शकतो?' असे भवभूतीने म्हटले आहे ते शिवाजी महाराजांच्या बाबतीत खरे आहे. त्यांच्या सारख्या लोकोत्तराच्या चित्ताचे दर्शन घेणे आणि शक्य तितके त्याचे विश्लेषण करणे ही अतिशय दुर्घट आणि कठीण गोष्ट आहे. ही दुर्घट गोष्ट साध्य करण्याचा प्रयत्न या शिवचरित्रात केला आहे. तो कितपत यशस्वी झाला हे वाचकांनीच ठरवायचे आहे. त्याचप्रमाणे शिवाजी महाराजांच्या संपर्कात आलेल्या शहाजीराजे, जिजाबाईसाहेब, दादोजी कोंडदेव,तानाजी, बाजीप्रभू, बाजी पासलकर, कान्होजी जेधे, संभाजी राजे हे 'आप्तस्वकीय' त्याचप्रमाणे अफझलखान, बाजी घोरपडे,शायिस्ताखान, मिर्झाराजा जयसिंग, दिलेरखान यांचीही व्यक्तिचित्रे शक्य तितके इतिहासाशी इमान राखून पण ठळक रितीने रंगविण्याचा या चरित्रात प्रयत्न केला आहे. शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्वाचा विकास कसा होत गेला आणि उत्तरोत्तर त्याला परिणत स्वरुप कसे प्राप्त होत गेले याचाही शक्य तितका उलगडा केलेला आहे. हे या चरित्राचे प्रयोजन आणि वैशिष्टय आहे.

'श्री शिवछत्रपती' या चरित्राचे दुसरे वैशिष्टय म्हणजे ज्या हिंदवी स्वराज्याचा निर्माता म्हणून शिवाजी महाराजांचे चरित्र चिरस्थायी झाले आहे त्या हिंदवी स्वराज्याचे स्वरूप शक्य तितके स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे. हिंदवी स्वराज्य हे काही आकाशातून पडले आणि पृथ्वीवर साकारले असे नव्हते. त्याच्या मागे देवगिरी, दक्षिणेतील राज्ये, विजयनगर यांची चारशे वर्षांची परंपरा होती. एका अर्थाने शिवाजी महाराजांचे हिंदवी स्वराज्य म्हणजे विजयनगरचे

अखिल भारतीय परिवर्धित स्वरुप होते, असे म्हणता येते. हिंदवी स्वराज्य म्हणजे काय या प्रश्नाचे उत्तर काही इतिहासकार समजतात तसे हिंदवी स्वराज्य म्हणजे हिंदू — मुसलमानांचे स्वराज्य असे मुळीच नव्हते. ते सर्वस्वी हिंदूंचे स्वराज्य होते आणि त्यात ख्रिश्चन आणि मुसलमान या परधर्मीयांना स्थान असले तरी त्यांचे राजकीय आणि सामाजिक नियंत्रण सर्वस्वी हिंदूंच्या हातात होते. या दृष्टीने या ग्रंथाच्या दुसऱ्या खंडातील 'हिंदवी स्वराज्य म्हणजे काय', 'हिंदवी स्वराज्य—हिंदू बहुसंख्य समाज', 'मुसलमान अल्पसंख्य समाज', 'ख्रिश्चन अल्पसंख्य समाज' ही प्रकरणे महत्वाची आहेत. त्याचप्रमाणे 'हिंदवी स्वराज्य —अर्थनीती','हिंदवी स्वराज्य—राज्यनीती', हिंदवी स्वराज्य—युध्दनीती' ही प्रकरणे विशेष महत्वाची आहेत. हिंदवी स्वराज्याची निर्मिती होतांना त्याच्यामागे वारकरी संप्रदाय आणि रामदासी संप्रदाय यांची पार्श्वभूमी होती म्हणून वारकरी संप्रदाय —एकनाथ,'रामदासी संप्रदाय—रामदास यांचाही ऊहापोह केला आहे. राज्याभिषेकानंतर हिंदवी स्वराज्याच्या विवेचनाला प्रारंभ केला आहे. हे विवेचन संपल्यानंतर पुन्हा शिवचरित्राकडे वळून शिवाजी महाराजांचे धर्मजीवन, शिवाजी महाराज व रामदास, शककर्ते शिवाजी महाराज, शिवाजी राजे व जिजाबाईसाहेब, दक्षिण दिग्विजय, गृहकलह, शिवाजी महाराज आणि संभाजी राजे आणि शेवटी आम्ही तो प्रयाण करतो हे अखेरचे प्रकरण लिहिलेले आहे. अशा प्रकारे व्यक्तिदर्शन आणि हिंदवी स्वराज्य ही या चरित्राची वैशिष्टये आहेत.

**एका महत्वपूर्ण गोष्टीचा उल्लेख करणे गरजेचे आहे. या चरित्रात सगळीकडे शिवाजीमहाराजांचा उल्लेख 'शिवाजी' या एकवचनाने केलेला आहे. त्यात शिवाजी महाराजांचा अनादर करण्याचा उद्देश अर्थातच नाही. आई, राजा, देव यांचा उल्लेख एकवचनाने करण्याचा पूर्वापार प्रघात आहे. उदाहरणार्थ रामदासांचे हे वचन पहा 'तू भक्तवत्सला रामा, बुध्दि दे रघुनायका!' इतिहास हे कोशाप्रमाणे शास्त्र आहे, आणि म्हणून कोशातल्याप्रमाणे इतिहासातही भूतकालीन व्यक्ती कितीही मोठी किंवा लहान असली तरी तिचा उल्लेख एकवचनाने केला जातो. या रीतीला अनुसरुनच शेजवलकर आणि सरदेसाई या प्रसिध्द इतिहासकारांनी आणि रा.वि.ओतुरकर यांच्यासारख्या इतिहासतज्ज्ञांनी शिवाजी महाराजांचा उल्लेख 'शिवाजी' या एकवचनाने केलेला आहे. तीच रीत या चरित्रातही अवलंबिलेली आहे. याबद्दल कोणी गैरसमज करुन घेऊ नये अशी विनंती आहे.**

श्रीशिवछत्रपती

हे चरित्र लिहितांना अनेक ग्रंथांची व ग्रंथकारांची मदत झाली आहे. त्यांचा उल्लेख नावानिशी त्या संदर्भात केलेला आहेच. त्याचप्रमाणे शिवाजी महाराजांच्या सुरतेवरच्या स्वारीचे ‘ सुरत फॅक्टरी रेकॉर्डस्’चा संबंधीत भाग कै.श्री निनाद बेडेकर यांनी टंकलिखित करुन पाठवला आणि कै. चंद्रकांत रघुनाथ देशपांडे यांनी शिवकालीन पत्रव्यवहाराचे दोन खंड मला वापरण्यास दिले याबद्दल मी त्यांचा अत्यंत आभारी आहे. याशिवाय ज्या स्नेहयांनी व सोबत्यांनी वेळोवेळी प्रोत्साहन देऊन हे चरित्र लिहिण्याची स्फूर्ती मला दिली त्यांची गणती करणेही शक्य नाही. तरीही कै.प्रा.डॉ.चं.रं.देशपांडे आणि प्रा. सुहास हरी जोशी यांचा उल्लेख करणे आवश्यक आहे.

या शिवचरित्राची संगणक प्रत तयार करणारे रोहयाचे श्री.अनिल प्रधान, मुखपृष्ठासाठी पालीचे श्री.योगेश राऊत व सुंदर स्वरुपात आपल्या हातात देणारे रिच प्रिंटस्चे श्री. प्रसन्न परांजपे यांचे मन:पूर्वक आभार.

हे चरित्र प्रसिध्द करण्याचे कै. मामाराव दाते यांनी ठरवले होते. त्यांच्यानंतर त्यांचे चिरंजीव मुकुंदराव यांनी हाती घेतले पण ते शक्य दिसेना तेंव्हा त्यांनी जपून ठेवलेली सर्व प्रकरणे माझा मुलगा चि. उमेश याच्या हाती पाठवून दिली. मुकुंदरावांचा हा जर साक्षेप नसता तर हे शिवचरित्र प्रसिध्दच होऊ शकले नसते. त्यांच्या नंतर माझा मोठा मुलगा चि. सुधीर यानी हे काम हाती घेऊन सिध्दीस नेले याबद्दल श्री. मुकुंदराव आणि चि. सुधीर यांचा मी ऋणी आहे.

**प्रा.श.श्री.पुराणिक,**
**सदनिका क्र २, ‘लोटस एन्क्लेव्ह’,**
**९८ आनंद पार्क,**
**औंध, पुणे. ४११ ००७,**
**दूरध्वनी : ०२० - २५८९६१३८**

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | शिवसंभव | १ — २३ |
| २. | शिवाजी — पहिली बारा वर्षे | २४ — ५३ |
| ३. | विजापूरशी पहिला मुकाबला! | ५४ — ७० |
| ४. | चढाईची चढती कमान | ७१ — ९३ |
| ५. | प्रतापगड — अफजलखान | ९४ — १२६ |
| ६. | पन्हाळगड — सिदी जोहर | १२७ — १४८ |
| ७. | शायिस्ताखान — लालमहाल | १४९ — १८२ |
| ८. | सुरतेची बेसुरत! | १८३ — २०९ |
| ९. | मीर्झा राजा जयसिंग | २१० — २८४ |
| १०. | आग्रा ती 'ऐतिहासिक भेट' | २८५ — ३३० |
| ११. | शिवाजी स्वगृही परततो ! | ३३१— ३५८ |
| १२. | आग्रा प्रकरणाची उत्तरक्रिया | ३५९ —३८१ |
| १३. | शान्तिपर्व — मध्यन्तर | ३८२ — ४९१ |